**ठळक बातम्या**

- इराण-इस्रायल संघर्षात अमेरिकेची उडी, इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला /संयुक्त राष्ट्रांकडून चिंता व्यक्त /तणाव कमी करण्यासाठी संवाद आणि वाटाघाटींचा मार्ग आवश्यक असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं मत

- संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला 75 वर्षे पूर्ण होत असल्यानिमित्त उद्या आणि परवा मुंबईत विधान भवनात महत्त्वपूर्ण राष्ट्रीय परिषद

- पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी दोन जणांना, तर उत्तर भारतात नक्षलवादी चळवळीचं पुनरुज्जीवन करण्याचा कट आखल्याच्या आरोपाखाली नवी दिल्लीत एकाला अटक

**आणि**

- मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये मुसळधार पावसाची शक्यता, दोन्ही राज्यांसाठी उद्यापर्यंत रेड अलर्ट

**<><><><>**

इराणच्या तीन आण्विक तळांवर हल्ला करुन अमेरिकेनं इराण-इस्रायल संघर्षात जाहीररीत्या उडी घेतली आहे. दहशतवादी कारवायांना रसद पुरवणाऱ्या देशाला लगाम घालण्यासाठी इतर कोणताही पर्याय शिल्लक राहिला नसल्यानं अमेरिकेनं नाईलाजास्तव ही कारवाई केल्याचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रंप यांनी म्हटलं आहे. इराणने आता शांतता प्रस्थापित करावी असं आवाहनही त्यांनी केलं आहे. अमेरिकेच्या या कारवाईचं इस्राएलनं स्वागत केलं आहे. त्यापाठोपाठ इस्रायलनं पश्चिम इराणमधल्या लष्करी तळांवर क्षेपणास्त्र हल्ले केले आहेत.

अमेरिकेनं केलेला हल्ला आंतरराष्ट्रीय कायदा, संयुक्त राष्ट्रांची सनद आणि अण्वस्त्र प्रसार विरोधी कायद्याचं उल्लंघन करणारा असल्याचं सांगत इराणने तीव्र निषेध व्यक्त केला आहे. या हल्ल्याचे दूरगामी परिणाम होतील, असा इशाराही इराणनं दिला आहे.

हल्ला झालेल्या फोर्डो, नतांज आणि एस्फहान इथं निवासी भागात कुठलाही किरणोत्साराचा धोका सर्वेक्षणात आढळलेला नाही, तसंच आपला अणुकार्यक्रम जारी राहील, असं इराणच्या अणुऊर्जा संस्थेनं म्हटलं आहे.

दरम्यान, संयुक्त राष्ट्रांचे सरचिटणीस अँटोनियो गुटेरस यांनी अमेरिकेच्या इराणवरच्या हल्ल्यांमुळे पश्चिम आशियातला संघर्ष नियंत्रणाबाहेर जाऊ शकतो, असा इशारा दिला आहे. अमेरिकेचे हल्ले हा आंतरराष्ट्रीय शांतता आणि सुरक्षेसाठी एक मोठा धोका असल्याचं गुटेरस यांनी आपल्या समाज माध्यमावरच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे.

**<><><><>**

पश्चिम आशियात सुरु झालेल्या संघर्षाबद्दल प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज इराणचे अध्यक्ष मसऊद पेझेश्कियान यांच्याकडे तीव्र चिंता व्यक्त केली. दोघांमधे यासंदर्भात तपशीलवार चर्चा झाली आणि पेझेश्कियान यांनी आपली भूमिका मांडली असं मोदी यांनी समाजमाध्यमावरच्या पोस्टमधे म्हटलं आहे.

या क्षेत्रातला तणाव कमी करणं गरजेचं असून त्याकरता संवादाचा आणि वाटाघाटींचा मार्ग स्वीकारणं या भागातल्या शांतता, स्थैर्य आणि सुरक्षेच्या दृष्टीनं आवश्यक असल्याचं मोदी यांनी सांगितलं.

**<><><><>**

इराणच्या आण्विक तळांवर अमेरिकेच्या लष्करी हल्ल्यानंतर आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. यूनायटेड किंग्डमचे प्रधानमंत्री केयर स्टार्मर यांनी प्रादेशित स्थैर्याचं महत्त्व अधोरेखित करताना अमेरिकेच्या कारवाईला पाठिंबा दिला आहे. ऑस्ट्रेलियानंही अमेरिकेच्या भूमिकेला पाठिंबा दिला असून इराणचा अणुकार्यक्रम आंतरराष्ट्रीय शांततेला धोका असल्याचं म्हटलं आहे. दुसरीकडे या हल्ल्यांविषयी चिंता व्यक्त करताना फ्रान्सनं आपला या हल्ल्यांमध्ये किंवा हल्ल्यांच्या नियोजनामध्ये कोणताही सहभाग नसल्याचं म्हटलं आहे. तिन्ही देशांनी संयम राखण्याचं आवाहनही फ्रान्सनं केलं आहे. आयर्लंडचे उपप्रधानमंत्री सायमन हॅरिस यांनीही या सगळ्यामुळे तणाव वाढण्याची शक्यता असल्याचं म्हटलं आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवर या संघर्षामुळे धोका उद्भवेल अशी भीती सौदी अरेबियाने व्यक्त केली असून संयम बाळगावा असं आवाहन या देशांना केलं आहे.

कतारच्या परराष्ट्र मंत्रालयानंही या तणावाचे गंभीर परिणाम होतील, अशी भीती व्यक्त केली आहे. तर ओमाननंही अमेरिकेच्या हल्ल्यांचा निषेध केला असून आंतरराष्ट्रीय कायद्यांचं आणि संयुक्त राष्ट्रांच्या सनदेचं हे उल्लंघन असल्याची प्रतिक्रिया दिली आहे.

**<><><><>**

संसदेच्या अंदाज समितीच्या कार्यारंभाला 75 वर्षे पूर्ण होत असून, या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त एक महत्त्वपूर्ण राष्ट्रीय परिषद उद्या आणि परवा मुंबईत विधान भवनात आयोजित केली आहे.

या दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेत "प्रशासकीय कामं सक्षमपणे आणि कमी खर्चात होण्याकरता अर्थसंकल्पीय अंदाजांचं पुनर्विलोकन आणि प्रभावी नियंत्रणात अंदाज समितीची भूमिका" या विषयावर विचारमंथन होईल. परिषदेच्या समारोपानंतर लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांची वार्ताहर परिषद होईल.

संसदेच्या तसंच सर्व राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशांच्या अंदाज समित्यांचे समिती प्रमुख आणि सदस्य या परिषदेत सहभागी होणार आहेत. विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे सर्व सदस्य आणि राज्यातले संसद सदस्य देखील या परिषदेला उपस्थित राहणार आहेत.

**<><><><>**

नाशिक आणि त्र्यंबकेश्वर इथं पुढच्या वर्षी होणाऱ्या कुंभमेळ्यापूर्वी नाशिक शहराला जोडणाऱ्या सर्व राष्ट्रीय महामार्गांचं विस्तारीकरण करण्याचे आदेश केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी दिले. नाशिक मधे होणाऱ्या कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नागपूरमधल्या हैदराबाद हाऊस इथं आज मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस आणि केंद्रीय रस्ते वाहतूक मंत्री नितीन गडकरी यांनी आढावा बैठक घेतली, त्यानंतर वार्ताहरांशी बोलताना मुख्यमंत्र्यांनी ही माहिती दिली. नाशिकमधे इतर सुविधा करण्याबाबतही केंद्रीय मंत्री गडकरी यांनी मान्यता दिल्याचं मुख्यमंत्र्यांनी वार्ताहरांना सांगितलं.

यासोबतच नागपुरातील नाग नदी पुनरुज्जीवन प्रकल्पा अंतर्गत जपानमधील जायका पुरस्कृत कंपनीद्वारे सांडपाणी व्यवस्थापन प्रकल्प, भूमिगत वीजवाहिनी तसंच खाजगी बसगाड्यांच्या वाहनतळाबद्दल या बैठकीत चर्चा झाल्याचं मुख्यमंत्री म्हणाले.

**<><><><>**

पहलगाम दहशतवादी हल्ल्याप्रकरणी एनआयए या राष्ट्रीय तपास यंत्रणेनं दोन जणांना अटक केली आहे. परवैझ अहमद जोथार आणि बशीर अहमद जोथार अशी त्यांची नावं असून त्यांच्याकडून आणखी तीन दहशतवाद्यांची महिती मिळाली असल्याचं एनआयएच्या सूत्रांनी सांगितलं. ते तिघे पाकिस्तानी नागरिक असून लष्कर ए तैयबाशी संबंधित आहेत. पहलगाममधे हिल पार्क इथं परवैझ आणि बशीर यांनी या तिघांना अन्न, निवारा आणि इतर मदत दिली होती. पुढचा तपास सुरु आहे.

<><><><>

उत्तर भारतात नक्षलवादी चळवळीचं पुनरुज्जीवन करण्याचा कट आखल्याच्या आरोपाखाली राष्ट्रीय तपास संस्थेने आज नवी दिल्लीतून एकाला अटक केली. त्याच्याकडून मोबाईल, पेन ड्राईव्ह, हार्ड ड्राईव्ह यासह इतर डिजिटल उपकरणं जप्त करण्यात आली आहेत. आरोपी उत्तरप्रदेशातल्या मथुरा इथला रहिवासी आहे. आरोपीने बिहारमधल्या छकरबंदा वनक्षेत्रात सक्रिय असलेल्या नक्षलवादी गटांना ड्रोनचा पुरवठा केला, नक्षलवाद्यांसाठी तांत्रिक प्रशिक्षण देण्यासाठी कार्यशाळा आयोजित केल्या, आणि नक्षलवाद्यांच्या केंद्रीय समितीच्या बैठकीत तो सहभागी झाला असे त्याच्यावर आरोप आहेत.

<><><><>

मध्य प्रदेश आणि गुजरातमध्ये अतिमुसळधार पाऊस पडण्याची शक्यता असून भारतीय हवामानशास्त्र विभागानं या राज्यांसाठी उद्यापर्यंत रेड अलर्ट जारी केला आहे. पुढले तीन-चार दिवस देशाच्या वायव्य आणि ईशान्य भागातही जोरदार पाऊस पडण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

नैऋत्य मोसमी पाऊस हिमाचल प्रदेश, लडाख, जम्मू-कश्मीर आणि पंजाबच्या काही भागात पोहोचला असून त्याच्या पुढील वाटचालीसाठी परिस्थिती अनुकूल आहे.

तामिळनाडू, किनारी आंध्र प्रदेश, रायलसीमा इथं तुरळक ठिकाणी पुढल्या दोन दिवसांपर्यंत हवामान उष्ण आणि दमट राहण्याचा हवामान विभागाचा अंदाज आहे.

<><><><>

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या ११ वर्षात भारतानं सेवा, सुशासन आणि गरीब कल्याण या तत्त्वांवर आधारित उपक्रमांमधून लक्षणीय बदल घडवला आहे.

गेल्या दशकभरात भारतातल्या उर्जाक्षेत्रात मागणी आणि पुरवठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. त्यात नवीकरणीय आणि अपारंपरिक उर्जास्त्रोतांचा मोठा वाटा आहे. जून २०२५ पर्यंत देशाची एकूण उर्जाउत्पादन क्षमता ४७६ गिगावॅट्सपर्यंत पोहोचली आहे. सौर उर्जेच्या बाबतीत भारताचा आता जगात तिसरा क्रमांक लागतो तर पवन उर्जेच्या बाबतीत भारत जगात चौथ्या क्रमांकावर आहे. एप्रिल २०१८ पर्यंत देशातल्या १०० टक्के खेड्यांपर्यंत वीज पोहोचली. त्यात २ कोटी ८० लाख घरांचा समावेश आहे. स्वच्छ आणि हरित उर्जा उत्पादनाच्या दिशेने भारताची दमदार वाटचाल सुरु आहे.

**<><><><>**

सुसंस्कृत समाजात हिंसा आणि दहशतवादाला स्थान नाही, सरकारने नक्षलवादाचं उच्चाटन करण्याचा संकल्प केला आहे, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी स्पष्ट केलं. अमित शहा दोन दिवसांच्या छत्तीसगड दौऱ्यावर आहेत.

**<><><><>**

केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी भरवलेल्या जनता दरबारात आज ९२ प्रकरणांचा निपटारा झाला. मुंबईतल्या कांदिवली इथल्या गोयल यांच्या कार्यालयात झालेल्या या उपक्रमात अनेक नागरिकांनी आपले तक्रार अर्ज आणि निवेदनं सादर केली.

**//<><><><>//**